# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
## (म्हाडाचा घटक)

मुंबई शहरातील ५८ बंद/ आजारी गिरण्यांमधील ज्या गिरणी कामगार/ वारसांनी दुबार/ तिबार (एकापेक्षा जास्त) अर्ज सादर केले आहेत त्यांच्याकरिता

**जाहीर सूचना**

बृहन्मुंबईतील ५८ बंद/ आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांकडून महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने गिरणीच्या जमिनीवर उपलब्ध होणाऱ्या सदनिकांच्या सोडतीकरिता सन २०११, सन २०१२ व तसेच २०१७ मध्ये जाहिरात देऊन गिरणी कामगारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने एकूण १,७४,०३६ गिरणी कामगार/वारस यांचेकडून अर्ज प्राप्त झाले आहेत.

गिरणी कामगार/वारसांच्या अर्ज संकलानामध्ये प्राप्त झालेल्या एकूण १,७४,०३६ अर्जांपैकी दुबार/तिबार नांवे १५,३९१ अर्ज असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा दुबार/तिबार १५,३९१ अर्जांची छाननी करण्यात आली.

छाननी अंती

१. गिरणी कामगार/ वारसांनी एकापेक्षा जास्त (दुबार/तिबार)अर्ज सादर केलेल्या एकूण १५३९१ गिरणी कामगार/ वारसांची यादी तक्ता "अ" मध्ये नमूद करण्यात आली आहे.
२. एकुण १५३९१ दुबार अर्जांपैकी यापुर्वी झालेल्या सोडतीमध्ये यशस्वी झालेले १३०५ अर्जदार व उर्वरीत दुबार/ तिबार अर्जांमधील होणाऱ्या संभाव्य सोडतीमधून वगळण्यात येणारी ६७७० अशी एकूण ८०७५ गिरणी कामगार/ वारसांची यादी तक्ता "ब" मध्ये नमूद करण्यात आली आहे.
३. वरील अ.क्र.२ मधील दुबार/तिबार अर्जदारांचे अर्ज वगळून उर्वरीत ७३१६ गिरणी कामगार/ वारसांचे अर्ज होणाऱ्या संभाव्य सोडतीकरिता ग्राह्य धरण्यात आले असुन त्यांची यादी तक्ता "क" मध्ये नमूद करण्यात आली आहे. तक्ता "अ", तक्ता "ब" व तक्ता "क" निहाय गिरणी कामगार/ वारसांची यादी म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली आहे.
४. गिरणी कामगार यांनी व त्यांचे वारसांनी एकाच गिरणी करिता एकापेक्षा जास्त अर्ज केले आहेत अशा प्रकरणी मूळ गिरणी कामगाराच्या अर्जाचा समावेश होणाऱ्या संभाव्य सोडतीच्या यादीमध्ये करण्यात येणार असल्यामुळे इतर वारसांचे अर्ज रद्द करण्यात आले आहेत.
५. ज्या गिरणी कामगारांच्या वारसांनी एकापेक्षा जास्त अर्ज सादर केले आहेत अशा प्रकरणी वारसांच्या अर्जांपैकी यादृच्छिकरित्या (Random) एका अर्जाचा समावेश सोडतीच्या यादीमध्ये करण्यात येऊन उर्वरीत वारसांचे अर्ज रद्द करण्यात आले आहेत. तथापी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या यादीच्या अनुषंगाने मुळ गिरणी कामगाराच्या वारसांनी त्यांचेपैकी एका वारसाचे नाव समाविष्ट करणेबाबत संमतीपत्र सादर केल्यास सदर वारसाचे नाव संभाव्य सोडतीच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येईल व सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या वारसांचे पात्रतेवेळी संबंधित तहसिलदार यांनी निर्गमित केलेल्या वारस प्रमाणपत्रामधील वारसांचे पंजीकृत हक्कसोड घेऊनच गिरणी कामगाराच्या एका वारसास सदनिकेचे वितरण करण्यात येईल.
६. ज्या गिरणी कामगार/वारसांची नावे सारखी आहेत परंतू गिरणी संकेत क्रमांक, जन्म तारीख, तिकिट क्रमांक, सेवा कालावधी, ESIC क्रमांक तसेच इत्यादी तपशील मिळता जुळता नाही, असे गिरणी कामगार/ वारस वेगवेगळे असल्याचे गृहित धरुन अशा अर्जदारांचा होणाऱ्या संभाव्य सोडतीच्या यादीमध्ये समावेश करण्यात येईल. असे गिरणी कामगार/वारस सोडतीमध्ये यशस्वी झाल्यास कागदपत्राच्या पडताळणीच्या वेळी अथवा भविष्यात अशा गिरणी कामगार/ वारसांनी एकापेक्षा जास्त अर्ज केल्याचे निदर्शनास आल्यास दुबार/ तिबार अर्जांपैकी एक अर्ज रद्द करण्यात येईल.

**(मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मान्यतेने.)**

(किरण कासणे)
उपमुख्य अधिकारी/गिरणी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई.